शिल्पकार विकासाचा...
# देशदूत
आज भविष्यवेध

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नंदुरबार | वर्ष २८ । अंक १० । गुरुवार, दि. ११ सप्टेंबर २०२५ । पाने - ८+८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

## मनोज जरांगेंचा पुन्हा एल्गार

**जालना ।** मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा छगन भुजबळ यांच्यावर जोरदार टीका केली आहे. सरकार चांगले आहे पण छगन भुजबळ हे सरकारला अडचणीत आणण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांच्यामुळे मराठा आणि ओबीसी समाजांमध्ये तेढ निर्माण होत आहे. देवेंद्र फडणवीस यांना छगन भुजबळामुळे डाग लागू नये, याची काळजी घेतली पाहिजे. छगन भुजबळांना आवर घालण्याची किंवा त्यांना तुरुंगात पाठवावे, अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे.

मुळव्याध, फिशर, भगंदर
इंजेक्शन व लेझरद्धारे उपचार
✔ संडासद्धारे रक्त पडणे व कोंब येणे
✔ गुदमार्गाच्या ठिकाणी खाज, सुज आग व वेदना होणे
✔ गुदमार्ग लहाण होणे ✔ गुदद्धाराजवळ सेप्टीक होणे
✔ माकड हाडाजवळ, खाज, गाठ किंवा पु होणे
कॅशलेस व मेडिक्लेम सुविधा उपलब्ध.
कृपया येतांना अपॉईमेंट घेऊन येणे...
डॉ. मनोज पाटील
M.S. [Shalya] | F.A.R.C.S. | जनरल सर्जन व गुदविकार तज्ज्ञ
लोढा हॉस्पीटल, जिल्हा बँकेजवळ, रिंग रोड, जळगांव. 70302 33533

## संपादकीय

### नेपाळमधील यादवीचा इशारा

नेपाळ हे भारताचे आणखी एक शेजारी राष्ट्र अंतर्गत यादवीमुळे अस्वस्थ आहे. त्याचे भयानक हिंसक रूप सर्वांच्याच अंगावर काटे आणणारे आहे. तेथील पंतप्रधानांनी राजीनामा दिला असला तरी संघर्ष शांत होण्याची चिन्हे अद्याप दृष्टिपथात नाहीत. सध्या तरी लष्कराने सूत्रे हाती घेतली आहेत. जागतिक नकाशावर भारताचे स्थान अधिकाधिक बळकट होत असताना शेजारी देशांशी संबंध मात्र तणावात येत आहेत. याचा फायदा चीनने घेतला नाही तरच नवल. चीन या देशांमध्ये हातपाय विस्तारत आहे. बहुसंख्य देश चीनची अंकित राष्ट्रे बनत चालली आहेत, असे म्हणणे धारिष्ट्याचे ठरू नये. २०२१ मध्ये म्यानमार व अफगाणिस्तान, २०२२ मध्ये पाकिस्तान, २०२४ मध्ये बांगलादेश आणि आता २०२५ मध्ये नेपाळ. मालदीव आणि भारतात तणाव आहे. सद्यस्थितीत यातील बहुसंख्य देशांशी भारताचे संबंध कमी अधिक फरकाने ताणलेले आहेत. पाकिस्तानशी उघड वैर आहे, तर चीनशी संबंध लपून राहिलेले नाहीत. भारताचे नेपाळशी संबंध राजकीय आणि व्यावहारिक पातळीवरदेखील चांगले होते. सत्ता कोणत्याही पक्षाची असली तरी हे संबंध त्या त्याकाळात दृढ होत गेले. आताही दोन्ही देशांमध्ये डिजिटल कनेक्ट आहे. भारतीय पर्यटक नेपाळमध्ये आर्थिक देवाणघेवाणीसाठी यूपीआय वापरू शकतात. पण परराष्ट्र संबंध फारसे सुरळीत नाहीत. आता तर नेपाळवर चीनचा प्रभाव वाढता आहे. त्या त्या देशांमधील प्रत्येक संघर्षाच्या वेळी देशाने स्वतःच्या हितसंबंधांना प्राधान्य देण्याची भूमिका घेतली असली तरी शेजारी देशांमधील अंतर्गत उलथापालथीचा परिणाम भारतावर आणि उर्वरित अन्य राष्ट्रांच्या संबंधांवर होणे क्रमप्राप्त आहे. आशियाई देशांमध्ये सगळ्यात बलवान देश भारतच आहे. भारताला छोट्या मोठ्या आशियाई देशांचा पालक मानले जात होते. तरीही या देशांमध्ये लोकांमध्ये सत्ताधाऱ्यांविरुद्ध संताप आहे हे का लक्षात येऊ शकले नसेल? जसे त्या त्या देशांच्या तत्कालीन राज्यकर्त्यांना जनतेच्या मनातील खदखद कळू शकली नाही, तद्वत उपरोक्त देशांमध्ये बंडाळी माजू शकते याचा अंदाज घेण्यात व परिस्थितीचे आकलन

पान २ वर »

# राधाकृष्णन यांना जगदीप धनखड यांनी दिल्या शुभेच्छा

**नवी दिल्ली ।** महाराष्ट्राचे राज्यपाल आणि भाजपचे ज्येष्ठ नेते सी. पी. राधाकृष्णन यांनी मंगळवारी उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत विजय मिळवला. या विजयानंतर देशभरातून त्यांना शुभेच्छा मिळत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींसह अनेक नेत्यांनी त्यांचे अभिनंदन केले. असे असताना माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही नवे उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांना शुभेच्छा दिल्या.



उपराष्ट्रपतिपदासाठी निवडणूक मंगळवारी पार पडली. यामध्ये एनडीएकडून महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन हे तर इंडिया आघाडीकडून सुदर्शन रेड्डी हे उमेदवार होते. या निवडणुकीत एनडीएचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांना ४५२ मते मिळाली. तर इंडिया आघाडीचे उमेदवार सुदर्शन रेड्डी यांना ३०० मते मिळाली आहेत. सी. पी. राधाकृष्णन हे या निवडणुकीत विजयी झाल्यानंतर माजी उपराष्ट्रपती धनखड यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. सी. पी. राधाकृष्णन व्यापक अनुभवामुळे उपराष्ट्रपतिपदाला अधिक गौरव मिळेल. हे प्रतिष्ठित पद स्वीकारल्याने आपल्या देशाच्या प्रतिनिधींचा विश्वास आणि आत्मविश्वास दिसून येतो.

जगदीप धनखड यांनी जुलैमध्ये उपराष्ट्रपतिपद सोडल्यानंतर हे त्यांचे पहिलेच जाहीर विधान आहे. राधाकृष्णन यांचे या उच्च पदावर निवड होणे हे लोकप्रतिनिधींचा विश्वास दर्शवते. सार्वजनिक जीवनातील त्यांच्या अनुभवामुळे उपराष्ट्रपतिपदाला अधिक आदर आणि प्रतिष्ठा मिळेल.

राधाकृष्णन यांच्या नेतृत्वाखाली उपराष्ट्रपतिपद नवीन उंची गाठेल आणि लोकशाही अधिक मजबूत होईल. त्यांनी त्यांना यशस्वी कार्यकाळ आणि देशसेवेसाठी शुभेच्छा दिल्या.

# सात जणांनी केला घात!

## महाविकास आघाडीत संशयकल्लोळाची उठली राळ

### क्रॉस व्होटिंग करणारे खासदार कोण?

**नवी दिल्ली ।** उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत एनडीएचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन १५२ मतांनी विजयी झाले आहेत. या निवडणुकीत इंडिया आघाडीची १५ मते फुटली आहेत. त्यामुळे विरोधकांच्या गोटात खळबळ उडाली आहे. मंगळवारी झालेल्या मतदानात कोणत्या खासदारांनी क्रॉस व्होटिंग केले, कोणी जाणूनबुजून मते अवैध ठरतील याची तजवीज केली, त्या खासदारांचा शोध काँग्रेसकडून घेतला जाणार आहे. त्यासाठी पक्षाकडून बैठक बोलावण्यात येणार आहे. दरम्यान महाराष्ट्रातील सात खासदारांनी क्रास व्होटींग केल्याचा संशय व्यक्त होत असल्याने राज्यात खळबळ उडाली आहे.

उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत इंडिया आघाडीची १५ मते फुटली. या निवडणुकीत १५ मते अवैध ठरली. क्रॉस व्होटिंग करणाऱ्यांमध्ये काँग्रेसच्या खासदारांचाही समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. इंडिया आघाडीतील



कोणकोणत्या खासदारांनी एनडीएचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांना मतदान केले आणि कोणकोणत्या खासदारांनी मत अवैध ठरेल याची काळजी घेऊन मतदान केले, याचा शोध काँग्रेस घेणार आहे.

सी. पी. राधाकृष्णन यांनी प्रथम पसंतीची ४५२ मते मिळवत विजय मिळवला. त्यांनी इंडिया आघाडीचे उमेदवार सुदर्शन रेड्डी यांचा १५२ मतांनी पराभव केला. राधाकृष्णन यांना ३०० मते मिळाली. यामुळे काँग्रेसच्या निवडणूक रणनितीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. इंडिया आघाडीतील ३१५ खासदारांनी



मतदान केल्याचा दावा काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी केला होता. पण रेड्डी यांना ३०० मतेच मिळाली आहेत. याचा अर्थ इंडिया आघाडीची १५ मते फुटलेली आहेत. क्रॉस व्होटिंग करणारे ७ खासदार महाराष्ट्रातील आहेत. यातील ३ शिवसेना उबाठा आणि ४ काँग्रेसचे असू शकतात असा अंदाज व्यक्त केला जात आहे. एनडीएचे उमेदवार मूळचे तामिळनाडूचे असल्याने द्रमुकच्या काही खासदारांची मतेही त्यांना मिळाली असल्याचा संशय आहे. यासोबतच आम आदमी पक्षाच्या काही खासदारांवरही संशय आहे.

उपराष्ट्रपतीच्या निवडणुकीत कोणतीही जोखीम नको यासाठी विरोधी पक्षातील खासदारांसाठी मॉक पोलचे आयोजन करण्यात आले होते. मात्र यानंतरही उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत १५ मते अवैध ठरली. गुप्त मतदान असल्याने कोणी जाणूनबुजून स्वतःचं मत अवैध ठरवले की त्यांच्या हातून चुकून हा प्रकार घडला, हे ओळखणे अवघड आहे.




## नेपाळ सीमेवर हाय अलर्ट

**नवी दिल्ली ।** भारताने नेपाळमधील सोशल मीडियावरील बंदी व भ्रष्टाचाराविरोधात उसळलेल्या हिंसक आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सीमेवरील सुरक्षा आणखी कडक केली आहे. आंदोलनाची तीव्रता वाढल्याने पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांनी राजीनामा दिला आहे. या घडामोडींनंतर भारताने नेपाळ सीमेवर उच्चस्तरीय सुरक्षा वाढवली आहे.

सशस्त्र सीमा बल आणि राज्य पोलिसांचे पथक एकत्रितपणे सीमेवर तैनात करण्यात आले आहे. कोणताही भारतीय भूभागात कोणत्याही तणावाचा फटका बसणार नाही, याची काळजी घेतली जात आहे. नेपाळमधील परिस्थिती लक्षात घेऊन भारत-नेपाळ सीमेवर सतर्कतेचा इशारा दिला आहे. भारत-नेपाळ सीमेचे स्वरूप भारत आणि नेपाळ यांच्यात १,७५१ किमी लांबीची खुली सीमा आहे. जी उत्तराखंड, उत्तर प्रदेश, बिहार, सिक्कीम आणि पश्चिम बंगाल या राज्यांतून पसरली आहे. १९५० च्या शांतता व मैत्री कराराअंतर्गत दोन्ही देशांच्या नागरिकांना मुक्तपणे ये-जा करण्याची मुभा आहे. ज्यामध्ये कोणत्याही निर्बंधाशिवाय नागरिकांसोबतच वस्तूंची वाहतूक होऊ शकते.

हालचालींवर बंधने आणण्यात आली आहेत. उत्तर प्रदेशातील लखीमपूर खीरी जिल्ह्यातील गौरिफंटा सीमेवर सुरक्षा दलांनी नेपाळी नागरिकांना भारतात प्रवेश देण्यास मज्जाव केला आहे. मात्र भारतातील नागरिकांना त्यांच्या देशात परतण्याची परवानगी देण्यात आली आहे. तशीच पावले नेपाळ सरकारनेही उचलली असून भारतीय नागरिकांना प्रवेशबंदी केली आहे.

## मनपा निवडणुकीसाठी शिंदे सेनेची २१ जणांची कार्यकारीणी

**मुंबई ।** मुंबई महापालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने मोर्चेबांधणी सुरु केली आहे. महापालिका निवडणुकीच्या तयारीचा भाग म्हणून शिंदे गटाने बुधवारी पक्षाची मुख्य कार्यकारी समिती जाहीर केली. महापालिका निवडणुकीसाठी पक्षाच्या पातळीवरील महत्त्वाचे निर्णय या समितीच्या माध्यमातून घेण्यात येणार आहेत.

या वर्षाच्या अखेरीस मुंबई महापालीकेची निवडणूक अपेक्षित आहे. मुंबईची निवडणूक महायुती म्हणून लढवली जाणार असल्याचे महायुतीच्या नेत्यांनी याआधीच जाहीर केले आहे.

मुख्य कार्यकारी समितीत शिवसेना नेते रामदास कदम, गजानन कीर्तीकर, आनंदराव अडसूळ, महिला आघाडीच्या नेत्या मीना कांबळी, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, रवींद्र वायकर, मिलिंद देवरा, राहुल शेवाळे, संजय निरुपम, आमदार प्रकाश सुर्वे, अशोक पाटील, दिलीप लांडे, तुकाराम काते, मंगेश कुडाळकर, मनीषा कायंदे, माजी आमदार सदा सरवणकर, यामिनी जाधव, दीपक सावंत आणि शिशिर शिंदे यांचा समावेश आहे.



**रायबरेली।** लोकसभेतील विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांनी बुधवारी आपल्या रायबरेली लोकसभा मतदार संघाचा दौरा केला, यावेळी त्यांनी एका सामाजिक संस्थेत वृक्षारोपण केले.

## सुशीला कार्की बनणार नेपाळच्या सुत्रधार!

**काठमांडू ।** नेपाळच्या राजकारणात एक नवीन वळण येत असल्याचे दिसते. हिंसाचार आणि संकटाच्या काळात देशाची सूत्रे कोण हाती घेणार हे ठरवण्यासाठी जनरल-झेड आंदोलकांनी व्हर्च्युअल बैठक बोलावली. या ऑनलाइन मेळाव्यात ५,००० हून अधिक तरुणांनी भाग घेतला आणि माजी मुख्य न्यायाधीश सुशीला कार्की यांना सर्वाधिक पाठिंबा मिळाला. काठमांडूचे महापौर बालेन शाह, ज्यांना आतापर्यंत जनरल-झेडचे पोस्टर लीडर मानले जात आहे, त्यांनी तरुणांच्या आवाहनाला प्रतिसाद दिला नाही. एका प्रतिनिधीने सांगितले की, त्यांनी आमचा फोन घेतला नाही, त्यानंतर चर्चा इतर नावांकडे वळली आणि सुशीला कार्की यांना सर्वाधिक पाठिंबा मिळाला.



कार्की यांनी यापूर्वी पंतप्रधानपदासाठी किमान १,००० लेखी स्वाक्षऱ्यांची अट घातली होती. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत त्यांना २,५०० हून अधिक समर्थन पत्रे मिळाली आहेत. बैठकीत इतर नावांवरही चर्चा झाली. कुलमान घिसिंग, सागर ढकाल आणि हरका संपांग यांसारख्या नावांवरही चर्चा झाली. सुशीला कार्की प्रस्ताव स्वीकारतात की नाही हे पाहणे मनोरंजक असेल, त्यानंतर असे मानले जाते की त्या प्रथम लष्करप्रमुख जनरल अशोक राज सिग्देल यांची भेट घेतील, त्यानंतर राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांची औपचारिक मान्यता आवश्यक असेल. मतदानासाठी अजूनही २३ तास शिल्लक आहेत आणि आतापर्यंत सुशीला कार्की यांना सर्वाधिक मते मिळाली आहेत. सुशीला कार्की या नेपाळच्या पहिल्या महिला मुख्य न्यायाधीश आहेत, ज्यांनी २०१६ मध्ये पदभार स्वीकारला. त्यांनी शिक्षिका म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली आणि नंतर सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश झाल्या.

## केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 1450 |
| नवती (२) | : 1250 |

## मिरकिली

नोकरी नाही...
मोफत तांदूळ
मोफत सायकल
मोफत लॅपटॉप
मोफत वीज
भिकारी करून टाकलेय....




## आठ महिन्यात हजार शेतकऱ्यांच्या आत्महत्या

**मुंबई ।** पीक कर्जमाफीचे खोटे स्वप्न दाखवून गद्दारी करणाऱ्या राज्यातील महायुती सरकारमुळे गेल्या आठ महिन्यांत राज्यातील तब्बल १ हजार १८३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचा दावा काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी बुधवारी एक्स या समाज माध्यमातून केला. या शेतकरी आत्महत्यांसाठी राज्यातील असंवेदनशील आणि विश्वासघातकी महायुती सरकार कारणीभूत असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी लगावला आहे. पश्चिम विदर्भात ७०७ तर छत्रपती संभाजीनगरमध्ये ५२० शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. सत्तेसाठी या सरकारने भोळ्या - भाबड्या शेतकरी बांधवांना कर्जमाफीचे आश्वासन देऊन मते मिळवली. पण शेतकऱ्यांना मिळाले काय तर कर्जमाफीसाठी समिती. अतिवृष्टीने शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. हाती आलेले पीक गेल्याने बँका कर्ज देत नाहीत. हतबल होऊन शेतकरी टोकाचे पाऊल उचलत आहे, असे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. पण सरकारला काही देणंघेणं नाही. महायुतीतील तीन पक्ष एकमेकांशी भांडतात, समाजात फूट पाडतात आणि शेतकरी मात्र मरत राहतो. हे सरकार गेंड्याच्या कातडीचं झाले आहे.

# धरणगाव नपाचा विभागात प्रथम क्रमांक

## १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेचा गौरव; जिल्हाधिकारी यांनी केला सत्कार

**धरणगाव ।** राज्य शासनाच्या १०० दिवसांच्या विशेष कार्यालयीन सुधारणा मोहिमेत धरणगाव नगरपरिषदेनश्र नाशिक विभागात प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या विशेष कामगिरीबद्दल नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रामनिवास झंवर व कर्मचारी यांचा जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या गौरव समारंभाला जिल्हा सहाय्यक जनार्दन पवार, यावल नगरपरिषदेचे मुख्याधिकारी निशिकांत गवई, तसेच धरणगाव नगरपरिषद कार्यालय अधीक्षक भिकान पारधी, राहुल तळेले, संतोष बिऱ्हाडे, महेश चौधरी, निलेश वाणी, गोपाळ चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते.

सत्कारप्रसंगी जिल्हाधिकारी प्रसाद यांनी




धरणगाव नपाने पारदर्शक, शिस्तबद्ध आणि नागरिकाभिमुख कामकाजाची अंमलबजावणी करत नाशिक विभागात आदर्श निर्माण केल्याबद्दल कौतुक केले. ही कामगिरी इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

### विकासाच्या दिशेने पाऊल

हा पुरस्कार केवळ माझा नसून संपूर्ण नगरपरिषद कर्मचारीवर्गाचा व धरणगावच्या नागरिकांचा आहे अशी भावना मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांनी व्यक्त केली. आगामी काळातही नागरिकाभिमुख, विकासाभिमुख व पारदर्शक कामकाज सुरू ठेवण्याचा संकल्प त्यांनी बोलून दाखविला. या यशामुळे धरणगाव नगरपरिषदेनं नाशिक विभागात एक वेगळी ओळख निर्माण केली असून हे शहराच्या विकासाच्या दिशेने मोठं पाऊल असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.